**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ११**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२८/०१/२०१५

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(४) नुसार** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ११ शनिवार दि. ३१/०१/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालय येथे बोलावण्यांत आली आहे. सदर सभे मध्ये खालील प्रमाणे कामकाज होईल.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या मान्यतेने

**(विषय सुची)**
**शनिवार दिनांक- ३१/०१/२०१५ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १३९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(३) व (४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समितीचे निवृत्त होणारे ८(आठ) सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणेबाबत. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ११**

विषय क्रमांक- १३९ शनिवार दिनांक ३१/१/२०१५

ठराव क्रमांक- १३९ शनिवार दिनांक ३१/१/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(३)व(४)नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समितीचे निवृत्त होणारे ८(आठ)सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे बाबत.

--**--

**<u>प्रस्तावाचा मजकुर :-</u>**

विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक माहे डिसेंबर -२०१३ मध्ये झाले नंतर महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक १५/०२/२०१४ रोजी घेण्यांत आली. सदर सभे मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (२) अन्वये मा.स्थायी समिती समितीच्या सोळा (१६) सन्माननीय सदस्यांची निवड करण्यांत आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(३) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यांत भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील."

वरील तरतुदी नुसार महानगरपालिकेची पहिली सभा दि.१५/२/२०१४ रोजी झालेली असून त्यामध्ये मा.स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक केली आहे. त्यामुळे दि.१/०२/२०१५ रोजी दुपार पासून मा.स्थायी समितीचे ८ (आठ ) सदस्य निवृत्त होतील.

मा.स्थायी समितीचे निम्मे म्हणजे ८(आठ)मा.सदस्य चिठ्ठया टाकुन निवृत्त करण्यांसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४)अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"पोट-कलम (२)अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने कलम (३)अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोट-कलम(३)मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरवील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्या नंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील.

परंतु पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याच्या पदाची मुदत त्याच्या फेर नेमणूकीच्या तारखे पासून मोजण्यात येईल."

तसेच कलम २०(५) अन्वये महानगरपालिकेने पोट कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे ,अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (४) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कोणते आठ सदस्य या वर्षी निवृत्त होणार आहेत ते चिठ्ठया टाकून ठरवणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (५) अन्वये सदरील ८ सदस्यांच्या पदांच्या जागा भरण्याकरीता महानगरपालिकेस माहे जानेवारी २०१५ मध्ये पुरेसा अवधी ठेवून माहे जानेवारी २०१५ मध्ये मा. स्थायी समितीच्या ८(आठ) सदस्यांच्या निवृत्तीचा निर्णय चिठ्ठया टाकून घेणेसाठी मा.स्थायी समितीची सभा घेणे बाबतची तारीख व वेळ मिळावी याकरीता मा.सभापती,स्थायी समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्र. नगरसचिव यांचा प्रस्ताव असे.

यावर मा. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत नुसार मा.स्थायी समितीची सभा घेणे आवश्यक असल्याने मा.सभापती स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे योग्य आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब (सा)यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

मा.सभापती स्थायी समिती कडे नगरसचिव विभागाकडून दिलेल्या पत्रावर मा.सभापती यांचा अभिप्राय - बैठक दिनांक ३१/१/२०१५ रोजी दुपारी १.०० वा. घेण्यात यावी कार्यवाही करावी.

---***---

## ठराव :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(३) व (४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी बोलावण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ११ शनिवार दिनांक ३१/१/२०१५ रोजी दुपारी १.००वाजता अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत,औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह येथे भरली असता सदर सभेमध्ये खालील प्रमाणे हजेरी पत्रकावर सहया केल्याप्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नाव | |
|---|---|---|
| १ | मा.श्री. किशोर आसाराम डागवाले | सभापती स्थायी समिती |
| २ | मा.श्रीमती मंगल सतिष गुंदेचा | सदस्या |
| ३ | मा.श्री. अजिंक्य सुधाकर बोरकर | सदस्य |
| ४ | मा.श्री. कुमार बबनराव वाकळे | सदस्य |
| ५ | मा.श्री. शेख फैयाज अजिजोद्दीन | सदस्य |
| ६ | मा.सौ. सुनिता महेंद्र कांबळे | सदस्या |
| ७ | मा.सौ. शारदा दिंगबर ढवण | सदस्या |
| ८ | मा.श्री. उमेश खंडेराव कवडे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | मा.श्री. सचिन तुकाराम जाधव | सदस्य |
| १० | मा.सौ. नंदा मनेष साठे | सदस्या |
| ११ | मा.श्री. दत्तात्रय हरिभाउ कावरे | सदस्य |
| १२ | मा.सौ. उषा शरद ठाणगे | सदस्या |
| १३ | मा.श्री. दिप नारायण चव्हाण | सदस्य |
| **त्याचप्रमाणे** | | |
| १ | मा.श्री. संपत विजय बारस्कर | सदस्य |
| २ | मा.श्री. बाळासाहेब मारूतीराव बोराटे | सदस्य |
| ३ | मा.सौ. सुनिता दत्तात्रय मुदगल | सदस्या |

हे सन्माननीय सदस्य अनुपस्थित होते.

उपरोक्त प्रमाणे सभेस उपस्थित असलेल्या मा.सदस्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३)व(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे दिनांक १/२/२०१५ रोजी दूपारी निवृत्त होणारे आठ सदस्य ठरविणे कामी आजची सभा बोलावण्यांत आलेली आहे. मा. शासनाचे राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या मा.सदस्यांच्या नांवाप्रमाणे मा.स्थायी समिती सदस्यांच्या नांवाच्या चिठ्ठया तयार करून त्या सभेमध्ये वाचून दाखविण्यांत येतील व त्या नावांच्या चिठ्ठयांच्या सारख्या घडया करण्यांत येवुन त्या चिठ्ठया एका पारदर्शक प्लॅस्टिकचे बरणीमध्ये टाकून, बरणीचे झाकण लाऊन, चांगल्या प्रकारे हलविण्यांत येवुन एकत्र करण्यांत येतील व चि.आकाश राहुल कांबळे, इयत्ता ३ री व चि. मयूर सुभाष ठोके , इयत्ता ४ थी , लोकमान्य विद्यालय,रिमांड होम,मनपा.शाळा,अ.नगर या शाळेमध्ये शिकत असलेल्या या विद्यार्थ्यां कडून बरणी मधील एक चिठ्ठी काढून त्यावरील नांव सभेस वाचून दाखविण्यांत येईल व पुन्हा बरणी बंद करून त्यामधील चिठ्ठया चांगल्या प्रकारे हलवून एकत्र करण्यात येतील व पुन्हा चिठ्ठी काढण्यात येईल. याप्रमाणे एकूण आठ चिठ्ठया काढून त्या चिठ्ठया वरील नांवे सभेमध्ये वाचून दाखविण्यांत येतील. वाचून दाखविलेल्या चिठ्ठया वरील नांवाप्रमाणे मा.स्थायी समितीचे ८(आठ) सदस्य नियमानुसार दिनांक १ /२/२०१५ रोजी दुपारी मा.स्थायी समितीच्या सदस्य पदावरून निवृत्त होतील व राहिलेले सदस्य पुढील वर्षा करीता मा.स्थायी समितीचे सदस्य म्हणून कार्यरत रहातील.संपूर्ण प्रक्रीयेचे व्हीडीओ शुटींग करण्यात येत आहे. याप्रमाणे सभेची कार्यवाही असेल. याप्रमाणे सभेत प्र.नगर सचिव श्री.मिलींद वैद्य यांनी सांगितले.

सभेस उपस्थित असलेल्या मा.सदस्यांना मा.स्थायी समितीचे सर्व १६(सोळा) सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठया वाचून दाखविण्यांत आल्या व त्यांचे व्हिडीओ शुटींग करण्यात आले. चिठ्ठयांच्या सारख्या घडया करण्यांत येवुन त्या एका पारदर्शक प्लॅस्टिकच्या बरणी मध्ये मोजून टाकण्यांत येवुन त्या चांगल्या प्रकारे मिसळण्यांत आल्या.त्यानंतर विद्यार्थ्यास बरणी मध्ये घडया करून टाकलेल्या चांगल्या प्रकारे मिसळलेल्या चिठ्ठयापैकी एक चिठ्ठी काढणेस सांगितले. त्याने काढलेली चिठ्ठी मा.उपायुक्त श्री.भालचंद्र बेहेरे आणि मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे यांना दाखवून मा.सभेस वाचून दाखविण्यांत आली. बरणी बंद करून पुन्हा बरणी हलवून चिठ्ठया मिसळण्यांत आल्या. याप्रमाणे एकूण ८ (आठ) चिठ्ठया काढून त्या मा.सभेस वरीलप्रमाणे वाचून दाखविण्यांत आल्या त्या चिठ्ठयामधील नांवे पुढील प्रमाणे.

| अ.नं. | सदस्यांचे नांवे | चिठ्ठी काढली. |
|---|---|---|
| १ | ढवण शारदाबाई दिगंबर | पहिली चिठ्ठी चि.मयूर ठोके |
| २ | कवडे उमेश खंडेराव | दुसरी चिठ्ठी चि. आकाश कांबळे |
| ३ | साठे नंदा मनेष | तिसरी चिठ्ठी चि. आकाश कांबळे |
| ४ | शेख फयाज अजीजोद्दीन | चौथी चिठ्ठी चि. आकाश कांबळे |
| ५ | मुदगल सुनिता दत्तात्रय | पाचवी चिठ्ठी चि. मयूर ठोके |
| ६ | कावरे दत्तात्रय हरिभाउ | सहावी चिठ्ठी चि. मयूर ठोके |
| ७ | बोराटे बाळासाहेब चंद्रशेखर मारूती | सातवी चिठ्ठी चि. मयूर ठोके |
| ८ | डागवाले किशोर आसाराम | आठवी चिठ्ठी चि. मयूर ठोके |

वरीलप्रमाणे नावे वाचून दाखविण्यांत आली. हे सदस्य दिनांक १/०२/२०१५ रोजी दुपारी निवृत्त होतील. असे मा.सभापती यांनी सांगितले.

तद्नंतर बरणीमध्ये राहिलेल्या चिठ्ठयावरील सदस्यांची नांवे सभेस वाचून दाखविण्यांत आली त्यामधील सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे

| अ.नं. | सदस्यांचे नांवे |
|---|---|
| १ | बारस्कर संपत विजय |
| २ | गुंदेचा मंगल सतिष |
| ३ | बोरकर अजिंक्य सुधाकर |
| ४ | वाकळे कुमार बबनराव |
| ५ | कांबळे सुनिता महेंद्र |
| ६ | जाधव सचिन तुकाराम |
| ७ | ठाणगे उषा शरद |
| ८ | चव्हाण दिप नारायण |

उपरोक्त वाचून दाखविल्या प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य हे पुढील वर्षाकरिता स्थायी समिती सदस्य म्हणून कार्यरत राहतील असे जाहीर करण्यांत आले.

यानंतर सभापती यांनी आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका